पुण्य नगरी

# 'रवळनाथ 'मार्फत २७ लाखांचा बोनस वाटप

**गडहिंग्लज :** रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या कर्मचाऱ्यांना दिवाळी सणानिमित्त बोनस देण्यात आला. कर्मचाऱ्यांना एकूण २७ लाख ११ हजार ६७४ रुपये बोनस वितरीत केल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली. चौगुले म्हणाले, सभासदांचा विश्वास, कर्मचाऱ्यांचे सहकार्य आणि परिश्रम यामुळे संस्थेने प्रगतीचा चढता आलेख कायम राखला आहे. संस्थेच्या व्यावसायिक प्रगतीमध्ये कर्मचाऱ्यांचे योगदान मोलाचे राहिले आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. त्यामुळे कर्मचारी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.



संस्थेच्या प्रधान कार्यालयासह १६ शाखांकडे मिळून सध्या १५९ कर्मचारी कार्यरत आहेत. एप्रिल २०१४ पासून कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोगानुसार वेतन तसेच प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युईटी, पेन्शन, मेडिक्लेम, पगारी रजा, बोनस आदी लाभ दिले जातात. यावेळी उपाध्यक्षा मीना रिंगणे, संचालक आर. एस. निळपणकर, व्ही. के. मायदेव, महेश मजती, उमा तोरगल्ली, डी. के. मायदेव उपस्थित होते.

Kolhapur Edition
Oct 16, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com